लोकमत

# कार्यालय नगर पंचायत, कोरची जिल्हा-गडचिरोली

## जाहीर प्रसिद्धीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 करण्यामागे दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगर पंचायत या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्र बिंदु मानून, नागरिकांना दैनंदीन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या महत्त्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3(अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसाओ-2015/प्र.क्र.189/नवि-14, दिनांक 23/06/2025 नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार एकुण 71 सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3(अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी 04 सेवा या फक्त महानगरपालिकेकरिता लागू असल्याने कोरची नगर पंचायतकडुन नागरीकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या 67 इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 कलम 3 अन्वये सदर 67 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्रक, फी, नियम कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी, यादी https://mahaulb.in/PortalSite/#/app/downloads या वेब पोर्टलवर व कोरची नगरपंचायतच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-

(श्री विकास शिंगाडे)

मुख्याधिकारी,

नगर पंचायत, कोरची

Nagpur Main
Page No. 4 Jan 29, 2025
Powered by: erelego.com



Scanned with CamScanner